# प्रकरण - ५

## महाविद्यालयाची क्रिडा क्षेत्रातील कामगिरी आणि माजी विद्यार्थी संघ

# प्रकरण पाचवे

## महाविद्यालयाची क्रिडा क्षेत्रातील कामगिरी आणि माजी विद्यार्थी संघ

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचा क्रिडावृत्तांत सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखाच आहे. प्रत्येक वर्षी महाविद्यालयाचा एखादा तरी खेळाडू ऑल इंडिया स्पर्धेत बक्षीस मिळवितोच. प्रत्येक खेळामध्ये महाविद्यालयाचे खेळाडू विद्यापीठ स्तरावर अग्रेसर असतात. शिवाजी विद्यापीठामध्ये क्रिडा क्षेत्रात राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयाची क्रिडा क्षेत्रातील कामगिरीचा आढावा खालीलप्रमाणे नमूद करता येईल.

**पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील क्रिडा संकुल -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील क्रिडा संकुल सुरू केले आहे.[१] या क्रिडा संकुलामध्ये विद्यार्थ्यांना विविध खेळाचे प्रशिक्षण दिले जाते.

शिवाजी विद्यापीठामध्ये एकूण चार महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण विभाग आहे. त्यामध्ये सांगली, भोगावती महाविद्यालय, (कुरूकली), जिल्हा कोल्हापूर,महावीर महाविद्यालय, कोल्हापूर, आणि राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर या महाविद्यालयाचा समावेश होतो.[२]

पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील क्रिडा संकुलामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कबड्डी, कुस्ती, जलतरण, सायकलिंग, कराटे, कॅरम, वजन उचलणे, बुद्धीबळ, तलवारबाजी इ. खेळांचे प्रशिक्षण दिले जाते.[३] प्रत्येक वर्षी महाविद्यालयाचे क्रिडापटू वरील स्पर्धांमध्ये भाग घेतात. सततचा सराव व अचूक मार्गदर्शन यामुळे महाविद्यालयाचे क्रिडापटू राष्ट्रीय पातळीपर्यंत यश संपादन करतात.

या महाविद्यालयास राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव दिले आहे. शाहू महाराज हे पुरोगामी विचाराचे राजे होते. त्यांनी शिक्षणाबरोबरच कुस्ती या पारंपारीक खेळाच्या विकासाकडेही जाणीवपूर्वक लक्ष दिले. शाहू महाराज हे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे गुरू हाते. राजर्षी शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांचा कर्मावर विश्वास होता. तोच वारसा महाविद्यालयाने पुढे चालू ठेवला आहे. महाविद्यालयातील क्रिडा शिक्षक सतत खेळाडूंबरोबर मैदानात असतात. प्राचार्यांचेही अनमोल असे सहकार्य, प्रेरणा, मार्गदर्शन खेळाडूंना लाभत असते. महाविद्यालयातील क्रिडा शिक्षक खेळाडूंसाठी प्रसंगी आर्थिक मदतही करतात. आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देतात म्हणूनच महाविद्यालयीन खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करीत आहेत. याचाच परिणाम म्हणून संपूर्ण भारतातून शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी महविद्यालयामध्ये येतात. वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी खेळामध्ये उत्तुंग असे यश मिळविले आहे. त्यामध्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सतिश मांडीया | - | मध्य प्रदेश |
| २. | रजनिश मांडीया | - | मध्य प्रदेश |
| ३. | आप्पा कदम | - | कर्नाटक |
| ४. | मोहन मोडक | - | बेंगलोर[४] |

वरिल विद्यार्थ्यांची नावे उदाहरणादाखल दिलेली आहेत. यावरून क्रिडा क्षेत्रात महाविद्यालयाचा नावलौकिक किती प्रस्थापित झालेला आहे ते समजते.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे रयत शिक्षण संस्थेचे असल्याने या महाविद्यालयावर समाजाचे प्रेम आहे. त्याचाच परिणाम म्हणून कोल्हपूरवासियानी महाविद्यालयस वेळोवेळी मदत, सहकार्य केले आहे. महाविद्यालयातील मल्लांना कोल्हापूरातील अनेक तालमीतील मल्ल प्रशिक्षण देतात. मल्लांकडून सराव करून

घेतात. मल्लांना आवश्यक ती मदत, सुविधा पुरवितात. महाविद्यालयातून माजी कुस्तीगीरही महाविद्यालयीन कुस्तीपटूंना प्रशिक्षण देतात. कोल्हापूरातील तालीम असोसिएशनचे सहकार्य असते.[५]

**पद्मश्री डॉ. भाऊराव पाटील क्रिडा संकूलातील सुविधा -**

क्रीडा संकूलामध्ये खेळाडूंसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख सुविधा पुढीलप्रमाणे -

१. **रनिंग ट्रॅक -**

१९८६-८७ साली महाविद्यालयामध्ये रनिंग ट्रॅक तयार करण्यात आला. त्या काळामध्ये रनिंग ट्रॅक असणारे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे कोल्हापूरातील एकमेव महाविद्यालय होते.[६] सद्या असा रनिंग ट्रॅक शिवाजी विद्यापीठ व राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय अशा दोन ठिकाणी कोल्हापूरमध्ये आहे. हा रनिंग ट्रॅक ४०० मीटर आहे.[७]

२. बास्केटबॉल कोर्ट

३. दोन कबड्डी कोर्ट

४. दोन खो-खो कोर्ट

५. फुटबॉल ग्राऊंड

६. क्रिकेट ग्राऊंड

७. मल्टीपर्पज इनडोअर हॉल

८. बॅडमिंटन कोर्ट[८]

**जिर्म्नॅशिअम -**

महाविद्यालयामध्ये एक लहान आकाराचे जिर्म्नॅशिअम आहे. ते २२.६८ स्क्वेअर मीटर एरियामध्ये असून या जिानॅशिअममध्ये १,२५,०००/- रूपयाची आधुनिक साधने

आहेत.[९] महाविद्यालयान अनेक चांगल्या दर्जाची साधने जिम्नॅशिअममध्ये उपलब्ध करून दिली आहेत ती पुढीलप्रमाणे[१०] -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गोळा | - | १६ पौंड - २ |
| | | | १२ पौंड - २ |
| | | | ८ पौंड - २ |
| २. | हॅमर | - | १६ पौंड - २ |
| | | | ८ पाँड - २ |
| ३. | थाळी | - | २ की.ग्रॅ. २ |
| | | | १ की.ग्रॅ. २ |
| ४. | भाला | - | ८०० ग्रॅम २ |
| | | | ६०० ग्रॅम २ |
| ५. | क्लॉपर | - | २ |
| ६. | बॅटेन | - | १२ |
| ७. | हाय जंम्प स्टँड | - | १ |
| ८. | पोल व्हाइट पोल | - | १ |
| ९. | टी बोर्ड | - | २ |
| १०. | वेट लिफ्टींग पोल | - | १ |
| ११. | पॉवर लिफ्टींग बार व वजने. | | |
| १२. | कॅरम बोर्ड | - | १ |
| १३. | चेस सेट | - | २ |
| १४. | बॉल बॅट | - | ४ |
| १५. | फ्लॅग | - | १ |
| १६. | स्टॉपवॉच | - | २ |
| १७. | जिमनॅस्टीक चार्ट | - | १२ |
| १८. | व्रेस्टलींग मॅट | - | १२ X १२ मीटर |

१९. हर्डल्स - २५

२०. टेक ऑफ बोर्ड - ४

२१. रिले बॅटन - ८

**महाविद्यालयामध्ये खेळाडूंसाठी उपलब्ध विविध सुविधा -**

छत्रपती शाहू महाराजांचा क्रिडाक्षेत्रातील वारसा पुढे चालविण्याचे व्रत महाविद्यालयाने अंगिकारले आहे. महाविद्यालयाने अनेक खेळाडू घडविले आहेत. या खेळाडूंसाठी महाविद्यालयाने पुढील सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

१. खेळाडूंसाठी महाविद्यालयामध्ये मोफत प्रवेश दिला जातो.

२. खेळाडूंसाठी महाविद्यालयामध्ये सर्व शुल्कामध्ये १००% सुट दिली जाते.

३. ग्रंथालय आणि बुक बँक या सुविधा पुरविल्या जातात.

४. खेळाडूची आर्थिक परिस्थिती गरीबीची असेल तर पात्र खेळाडूला राहण्यासाठी महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये मोफत जागा दिली जाते.

५. महाविद्यालयामध्ये खेळाडू जर आपला अधिक वेळ खेळाच्या प्रॅक्टीससाठी घालवित असेल तर किंवा विविध क्रिडा स्पर्धांमध्ये भाग घेतला असेल तर त्याला वर्गात अनुपस्थित रहावे लागेले तर त्या विषयांचे प्राध्यापक अशा विद्यार्थ्यांसाठी स्पेशल लेक्चर्स घेतात व खेळाडूंचा अभ्यासक्रम भरून काढण्यास मदत करतात.[११]

६. ज्या खेळाडूंनी राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. अशा खेळाडूंना महाविद्यालयातर्फे वर्षाला रूपये १०००/- बक्षीस देण्यात येते.[१२]

७. महाविद्यालयातील क्रिडाशिक्षक संभाजी पाटील, आर.बी.पाटील हे सतत खेळाडूंसमवेत राहून त्यांचा अधिकाधिक सराव करून घेतात.[१३]

८. खेळाडूंसाठी विविध साधने, सुविधा, ड्रेस, शूज, खेळाडूंच्या पोषक आहारासाठी आर्थिक मदत, खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आवश्यक आर्थिक निधी महाविद्यालयातील प्राध्यापक स्वतःच्या पगारामधून उभा करतात.[१४]

९. खेळाडूंचा सराव रोज सकाळी ६ ते ८ व संध्याकाळी ५ ते ७ या वेळेमध्ये करून घेतला जातो. महाविद्यालयाचे क्रिडा शिक्षक संभाजी पाटील यांच्या मते खेळाडूंचा एखादा तास चुकला तरी चालेल परंतु खेळाडूंच्या सरावामध्ये खंड पडता कामा नये.[१५]

१०. महाविद्यालयातील प्राचार्य बॅ.पी. जी. पाटील सरांपासून ते आजपर्यंत सर्वच प्राचार्यांनी खेळाला अतिशय महत्त्व दिले आहे. सर्वच प्राचार्यांनी महाविद्यालयामध्ये अद्ययावत भव्य क्रिडांगण सर्व साधने, सुविधांनी परिपुर्ण असा जिमखाना करण्यासाठी प्रयत्न केले. महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक यांनी पहिल्यापासून खेळाडूंबद्दल आपुलकी दाखविली आहे. खेळाडूंना सतत प्रोत्साहन, प्रेरणा, मार्गदर्शन महाविद्यालयामधून मिळते.[१६]

## आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचे यश -

महाविद्यालयातील खेळाडू प्रत्येक वर्षी यश संपादन करत असतात. यासाठी खेळाडूंचे प्रयत्न तर कारणीभूत आहेतच परंतू त्याचबरोबर महाविद्यालयामधूनही खेळाडूंना आवश्यक मदत, प्रोत्साहन, मार्गदर्शन मिळत असते. आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांची यादी पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू -

१. रामचंद्र सारंग - १९८१-८२ या वर्षामध्ये अमेरिका येथील आंतरराष्ट्रीय ज्युनिअर कुस्ती चॅम्पीयअनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झाली.

१९८२-८३ मध्ये ऑस्ट्रेलिया (ब्रीस्बन) येथे राष्ट्रकुल कुस्ती चॅम्पीयनशिप स्पर्धेमध्ये सहभागी होवून कुस्तीमधील सुवर्णपदक जिंकले.[१७]

२. कुमारी पुष्पलता मंगल - १९८४-८५ मध्ये आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड झाली.[१८]

३. संभाजी पाटील - १९८२-८३ मध्ये अमेरिकेत ज्युनिअर कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले.[१९]

४. मयुर तावडे - १९८४-८५ मध्ये बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय संघात निवड[२०]

५. बाबासाहेब निकम - १९९७-९८ मध्ये आशिया गेम्समध्ये भारताचे नेतृत्व केले. अमेरिकेमध्ये होणाऱ्या क्रॉस-कंट्री टुर्नामेंटसाठी निवड झाली.[२१]

राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केलेले खेळाडू[२२] -

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| १. | पी.जी.पाटील | कुस्ती, ५२ की.ग्रॅ. | १९६८-८९ | सुवर्णपदक |
| २. | एन.ए. पाटील | कुस्ती, ४८ की.ग्रॅ | १९७१-७२ | ब्रान्झपदक |
| ३. | आर.डी.पाटील | कुस्ती, ४२ की.ग्रॅ | १९७२-७३ | कास्यपदक |
| ४. | कुमारी वत्सला कदम | कबड्डी | १९७२-७३ | सुवर्णपदक |
| ५. | आर.बी.पाटील | ॲथलेटिक्स रनिंग | १९७३-७४ | सुवर्णपदक नॅशनल ॲवार्ड |

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| ६. | आर.व्ही. शेडगे | १०० मी रनिंग | १९७३-७४ | रौप्यपदक |
| ७. | एन.ए. पाटील | कुस्ती, ४८ की.ग्रॅ | १९७३-७४ | सुवर्णपदक |
| ८. | आर.डी.पाटील | कुस्ती, ८२ की.ग्रॅ | १९७३-७४ | रौप्यपदक |
| ९. | भिकाजी मांडवी | कुस्ती, ९० की.ग्रॅ | १९७४-७५ | रौप्यपदक |
| १०. | डी.एस.मोहोळ | कुस्ती,१०० की.ग्रॅ | १९७४-७५ | रौप्यपदक |
| ११. | शहाजी धुमाळ | कुस्ती, ५२ की.ग्रॅ | १९७५-७६ | ब्रान्सपदक |
| १२. | के.एल. कळंगे | कुस्ती, ६२ की.ग्रॅ | १९७६-७७ | रौप्यपदक |
| १३. | व्ही.पी.पाटील | कबड्डी | १९७७-७८ | सुवर्णपदक |
| १४. | बी.डी. देसाई | कबड्डी | १९७७-७८ | सुवर्णपदक |
| १५. | व्ही.बी. खानविलकर | कबड्डी | १९७७-७८ | सुवर्णपदक |
| १६. | एम.आर.पाटील | कबड्डी | १९७७-७८ | सुवर्णपदक |
| १७. | गोविंद घाटगे | कबड्डी | १९७७-७८ | सुवर्णपदक |
| १८. | पी.एम. शेणवी | १०००० मीटर रनिंग | १९७७-७८ | ब्रान्सपदक |
| १९. | एम.एस. पाटील | कुस्ती ९० कि.ग्रॅ. | १९७८-७९ | रौप्यपदक |
| २०. | आर.आर.कडोलकर | कुस्ती ६७ कि.ग्रॅ. | १९७८-७९ | सुवर्णपदक |
| २१. | पी.एम.शेणवी | ५००० मी.रनिंग | १९७८-७९ | रौप्यपदक |
| २२. | पी.एम.शेणवी | ५००० मी.रनिंग | १९७९-८० | सुवर्णपदक नवा उच्चांक |
| २३. | पी.एम.शेणवी | १०००० मी.रनिंग | १९७९-८० | सुवर्णपदक |

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| २४. | बी.आर. धांडे | कुस्ती १०० कि.ग्रॅ. | १९७९-८० | रौप्यपदक |
| २५. | बी.आर. धांडे | कुस्ती १०० कि.ग्रॅ. | १९८०-८१ | रौप्यपदक |
| २६. | संभाजी पाटील | कुस्ती ४८ कि.ग्रॅ. | १९८१-८२ | रौप्यपदक |
| २७. | आर.आर.कडोलकर | कुस्ती ७४ कि.ग्रॅ. | १९८१-८२ | रौप्यपदक |
| २८. | एन.गावडे | कबड्डी | १९८२-८३ | रौप्यपदक |
| २९. | व्ही. गावडे | कबड्डी | १९८२-८३ | रौप्यपदक |
| ३०. | एस.चौगुले | कुस्ती ५७ कि.ग्रॅ. | १९८३-८४ | ब्रान्झपदक |
| ३१ | एम.गोचडे | कुस्ती ६२ कि.ग्रॅ. | १९८३-८४ | रौप्यपदक |
| ३२. | सतिश मांडिया | कुस्ती ७४ कि.ग्रॅ. | १९८५-८६ | ब्रान्झपदक |
| ३३. | सतिश मांडिया | कुस्ती ९० कि.ग्रॅ. | १९८६-८७ | सुवर्णपदक |
| ३४. | बी. कुरणे | वेटलिफ्टींग ५२ कि.ग्रॅ. | १९८७-८८ | रौप्यपदक |
| ३५. | संपत मोलाणे | कबड्डी | १९८७-८८ | सूवर्णपदक |
| ३६. | प्रमोद पाटील | कबड्डी | १९८७-८८ | सुवर्णपदक |
| ३७. | एम.व्ही. जाधव | कुस्ती ४८ कि.ग्रॅ. | १९८८-८९ | सुवर्णपदक |
| ३८. | एम.पाटील | कुस्ती ५७ कि.ग्रॅ. | १९८८-८९ | रौप्यपदक |
| ३९. | रजनिश मांडिया | कुस्ती १०० कि.ग्रॅ. | १९८८-८९ | ब्रान्झपदक |
| ४०. | मारूती जाधव | कुस्ती ४८ कि.ग्रॅ. | १९८९-९० | रौप्यपदक |
| ४१. | विलास पाटील | कुस्ती ६५ कि.ग्रॅ. | १९८९-९० | रौप्यपदक |
| ४२. | बदरूद्दीन हंगड | कुस्ती ८२ कि.ग्रॅ. | १९९०-९१ | रौप्यपदक |

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| ४३. | मारूती पाटील | कुस्ती ४८ कि.ग्रॅ. | १९९०-९१ | सुवर्णपदक |
| ४४. | विलास पाटील | कुस्ती ६८ कि.ग्रॅ. | १९९०-९१ | सुवर्णपदक |
| ४५. | आर.टी.पाटील | रनिग ४०० मी. | १९९१-९२ | ब्रान्झपदक |
| ४६. | आर.टी.पाटील | रनिग १०० मी. | १९९०-९१ | सुवर्णपदक |
| ४७. | राजाराम मगदूम | कुस्ती ८२ कि.ग्रॅ. | १९९१-९२ | रौप्यपदक |
| ४८. | विजय बोरगे | कुस्ती ७१ कि.ग्रॅ. | १९९१-९२ | रौप्यपदक |
| ४८. | नेताजी पालकर | कबड्डी | १९९२-९३ | ब्रान्झपदक |
| ५०. | रघुनाथ पाटील | कबड्डी | १९९२-९३ | ब्रान्झपदक |
| ५१. | राजू सुतार | वेटलिफ्टींग १०८ कि.ग्रॅ. | १९९३-९४ | सुवर्णपदक |
| ५२. | शिला लुगडे | कबड्डी | १९९२-९३ | सुवर्णपदक |
| ५३. | मुक्ता चौगुले | कबड्डी | १९९३-९४ | सुवर्णपदक |
| ५४. | बाळासाहेब निकम | रनिंग ५००० मी. | १९९५-९६ | सुवर्णपदक |
| ५५. | बाळासाहेब निकम | रनिंग १०००० मी. | १९९५-९६ | सुवर्णपदक |
| ५६. | राजू सुतार | वेटलिफ्टींग | १९९५-९६ | सुवर्णपदक |
| ५७. | धनाजी पवार | कुस्ती १०० कि.ग्रॅ | १९९५-९६ | ब्रान्झपदक |
| ५८. | राजाराम मगदूम | कुस्ती ८२ कि.ग्रॅ. | १९९५-९६ | सुवर्णपदक |
| ५९. | संजय सावंत | कुस्ती ७४ कि.ग्रॅ. | १९९५-९६ | रौप्यपदक |
| ६०. | बाबू सोनाज | कुस्ती ६० कि.ग्रॅ. | १९९६-९७ | सुवर्णपदक |
| ६१. | विनय पाटील | कबड्डी | १९९६-९७ | ब्रान्झपदक |
| ६२. | बाळासाहेब निकम | रनिंग १०००० मी. | १९९७-९८ | सुवर्णपदक |

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| ६३. | शुक्रांती कांबळे | कबड्डी | २०००-०१ | ब्रान्झपदक |
| ६४. | मजूलाल शेख | कुस्ती ८५ कि.ग्रॅ. | २०००-०१ | ब्रान्झपदक |
| ६५ | नितीन माने | कुस्ती ९७ कि.ग्रॅ. | २००१-०२ | ब्रान्झपदक |
| ६६. | विनय पवार | बुद्धीबळ | २००१-०२ | ब्रान्झपदक |
| ६७. | सुप्रिया भोई | कबड्डी | २००१-०२ | सुवर्णपदक |
| ६८. | प्रविण साळोखे | कबड्डी | २००१-०२ | सुवर्णपदक |
| ६९. | देवेंद्र बिरनाळे | कबड्डी | २००१-०२ | सुवर्णपदक |
| ७०. | विशाल चव्हाण-पाटील | कबड्डी | २००१-०२ | सुवर्णपदक |
| ७१. | अनिल बंडू पोवार | ट्रायसिकल ४०० मीटर रेस | २००२-०३ | सुवर्णपदक[२३] |
| ७२. | ज्योती जाधव | १०० मी. रनिंग | २००३-०४ | कास्यपदक |
| ७३. | ज्योती जाधव | थाळीफेक | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ७४. | सुजाता शिंदे | कबड्डी | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ७५. | रूपाली पाटील | कबड्डी | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ७६. | सुप्रिया चव्हाण | कबड्डी | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ७७. | वैशाली निकम | कबड्डी | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ७८. | महादेव पुजारी | कबड्डी | २००३-०४ | ब्रान्झपदक |
| ८९. | परशुराम गायकवाड | कबड्डी | २००३-०४ | ब्रान्झपदक |
| ८०. | रविंद्र खडे | ५०० मी. धावणे | २००३-०४ | रौप्यपदक |
| ८१. | ज्योती जाधव | १०० मी. धावणे | २००३-०४ | सुवर्णपदक |
| ८२. | ज्योती जाधव | थाळीफेक | २००३-०४ | रौप्यपदक[२४] |

| अ.. क्र | खेळाडूंचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पदक |
|---|---|---|---|---|
| ८३. | अरूण पाटील | कबड्डी | २००४-०५ | सुवर्णपदक |
| ८४. | पंडित पोवार | कबड्डी | २००४-०५ | सुवर्णपदक |
| ८५. | ज्योती जाधव | गोळाफेक | २००४-०५ | रौप्यपदक |
| ८६. | ज्योती जाधव | भालाफेक | २००४-०५ | सुवर्णपदक |
| ८७. | सुभाष पाटील | कुस्ती ५५ कि.ग्रॅ. | २००४-०५ | रौप्यपदक |
| ८८. | संदीप बुचडे | कुस्ती ६६ कि.ग्रॅ. | २००४-०५ | ब्रान्झपदक |
| ८९. | परिणिता पोवार | लांब व उंच उडी | २००४-०५ | रौप्यपदक[२५] |

**राज्यपातळीवरील पुरस्कारप्राप्त महाविद्यालयीन विद्यार्थी -**

शाहू महाराजांच्या नावाने सुरू झालेल्या व कर्मवीर आण्णांच्या आशिर्वाद असलेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नांव संपूर्ण भारतभर केले आहे. महाविद्यालयामधून मिळालेले प्रशिक्षण, रूजविलेले सुसंस्कार, मिळालेले समाजसेवेचे व्रत व महाविद्यालयाशी संबंधीत सर्वांचे आशिर्वाद, सहकार्य यांच्या जोरावर काही खेळाडूंनी आपल्या भावी आयुष्यात अनेक क्रिडा पुरस्कार प्राप्त केले. त्याची यादी खालीप्रमाणे[२६]

| अ.क्र. | खेळाडूचे नांव | खेळाचे नांव | वर्ष | पुरस्कार |
|---|---|---|---|---|
| १. | आप्पा कदम | कुस्ती | १९७८-७९ | महाराष्ट्र केसरी |
| २. | रामचंद्र सारंग | कुस्ती | १९८२-८३ | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ३. | मयुर तावडे | बॅडमिंटन | १९८९-९० | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ४. | कु.पुष्पलता मंगल | बुद्धीबळ | १९९३-९४ | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ५. | कु.मुक्ता चौगुले | कबड्डी | १९९५-९६ | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ६. | कु. उमा भोसले | कबड्डी | १९९५-९६ | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ७. | रमेश भेंडगिरी | कबड्डी | १९९५-९६ | दादोजी कोंडदेव पुरस्कार |
| ८. | राजू सुतार | वजन उचलणे | १९९६-९७ | शिव-छत्रपती पुरस्कार |
| ९. | आर.बी. पाटील | स्पोर्ट ऑर्गनायझर | २००१-०२ | शिव-छत्रपती पुरस्कार |

शिवाजी विद्यापीठात सलग २८ वर्षे विभागीय व आंतरविभागीय कुस्तीस्पर्धेत राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचा संघ अंजिक्य ठरला आहे[२७] हे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे. तसेच अनेक वेळा महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने 'तवनाप्पा पाटणे ट्रॉफी' जिंकली आहे.

**महाविद्यालयाच्या विस्तीर्ण क्रिडांगणाचा इतर संस्था व शाळांनी केलेला वापर-**

महाविद्यालय सुरू झाल्यापासून आजअखेर महाविद्यालयाने खेळाला अतिशय महत्त्व दिले आहे. त्यासाठी महाविद्यालयाचे क्रिडांगण अद्ययावत करण्यासाठी सर्वच प्राचार्यांनी विशेष प्रयत्न केले. त्या प्रयत्नांना यश येवून महाविद्यालयीन क्रिडांगण व क्रिडा विभाग कोल्हापूर जिल्ह्यात अद्ययावत आहे. म्हणूनच इतर शाळा, संस्था वेगवेगळ्या स्पर्धांसाठी त्याचा वापर करतात. त्या क्रिडास्पर्धांची माहिती पुढीलप्रमाणे[२८]

| अ.क्र. | संस्था/संघटनेचे नांव | वर्ष | खेळाचे नांव/हेतू |
|---|---|---|---|
| १. | लाईफ ईन्शुरन्स कारपोरेशन | २१-११-९८ | अॅथलेटिक्स |
| २. | कोरेगावकर हायस्कूल,कोल्हापूर | ०३-१२-९८<br>०४-१२-९८ | वार्षिक क्रिडा स्पर्धा |
| ३. | द न्यू इंडिया अॅशुरन्स कार्पोरेशन, कोल्हापूर | १९-१२-९८<br>२०-१२-९८ | अॅथलेटिक्स |
| ५. | स्टेट ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन कोल्हापूर (एम्पलॉइ) | २०-१२-९८ | कबड्डी, अॅथलेटिक्स व्हॉलीबॉल सिलेक्शन टेस्ट |
| ६. | एम्लॉइ प्रोव्हीडंट फंड स्टाफ रिक्रेशनन क्लब, कोल्हापूर | ०७-०१-९९ | अॅथलेटिक्स |
| ७. | आजरा कॉलेज, आजरा | १९-१०-९९<br>१६-१०-९९ | झोनल अॅथलेटिक्स |
| ७. | द गव्हर्मेट स्पोर्टस कॉन्टेस्ट | २२-८-२०००<br>२५-८-२००० | अॅथलेटिक्स |
| ८. | द गव्हर्मेट स्पोर्टस कॉन्टेस्ट | २८-८-२०००<br>३०-८-२०००<br>५-१०-२०००<br>७-१०-२०००<br>१३-९-२०००<br>१५-९-२००० | अॅथलेटिक्स |
| ९. | कोरेगावकर हायस्कूल,कोल्हापूर | २-१-२००० | अंतर्गत क्रिडा स्पर्धा |
| १०. | कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन | २००१-२००२ | कबड्डी |
| ११. | प्रकाश विद्या मंदिर | ११-१२-२००१ | वार्षिक क्रिडा स्पर्धा |
| १२. | कोल्हापूर म्युन्सीपल कार्पोरेशन | ९-१२-२००१<br>२०-१-२००२ | पल्स पोलिओ डोस |

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | छत्रपती माध्यमिक उच्च | २७-१-२००२ | शैक्षणिक सहलीसाठी |
| १४. | माध्यमिक शाळा, वडगांव | | राहण्यासाठी जागा |
| १५. | कोल्हापूर ॲमटर ॲथलेटक्स असोसिएशन | १७-८-२००२ | ॲथलेटिक्स |
| १६. | १७वी महाराष्ट्र स्टेट पोलिस टुर्नामेंटस | ९-११-२००२<br>१५-११-२००२ | ॲथलेटिक्स |
| १७. | कोरेगावकर हायस्कूल,कोल्हापूर २५-११-२०० | २२-११-२००२ | ॲथलेटिक्स |
| १८. | स्टेट ट्रान्स्पोर्ट कार्पोरेशन, कोल्हापूर | ९-१२/००२ | ॲथलेटिक्स सिलेक्शन टेस्ट |

कर्मवीर भाऊराव पाटील यांची इच्छा होती की शाहू नगरीत रयत शिक्षण संस्थेचे एक कॉलेज असावे आणि ते कुस्तीमध्ये देशभर गाजावे.[२९] कर्मवीर आण्णांचे हे स्वप्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पूर्ण केले. महाविद्यालयातील खेळाडूंनी महाविद्यालयाचे व कोल्हापूरचे नांव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले आहे. खेळाडूंच्या या यशामध्ये खेळाडूंचे प्रयत्न तर कारणीभूत आहेतच त्याचबरोबर महाविद्यालयाचे कार्यही महत्त्वाच आहे. खेळाडूंच्या यशस्वी वाटचालीत महाविद्यालय किती महत्त्वाचे आहे हे काही खेळाडूंनी लिहिलेल्या प्रतिक्रियांमधून स्पष्ट होते.

**रामचंद्र सारंग -**

"राजर्षी शाहू कॉलेजचे" फिजीकल ट्रेनिंगचे डायेक्टर श्री. आर.बी.पाटील, प्रा. येडेकर सर व श्री. आर.डी. पाटील सर यांनी माझ्या कॉलेज शिक्षणाचा खर्च माफ करणेस लावून अभ्यासासाठी पुस्तके, ट्रॅकसूट वगैरेचा खर्च दिला. माझ्या कुस्ती जीवनातील सर्वोच्च यश माझ्या शाहू कॉलेजच्या विद्यार्थी दशेत मिळाले.[३०]

**पै. नामदेव आप्पाजी पाटील -**

कर्मवीर आण्णांचे नाव घेवूनच मी मैदानात उतरत असे. शाहू कॉलेजने माझ्यावर अतिशय प्रेम केले कॉलेजकडे पैसा नसल्यामुळे प्रा. येडेकर सरांनी वसंतराव शिरगावकर यांच्याकडे माझ्यासाठी शब्द टाकला, ते मला दरमहा रू.३०/- देत असत तोच माझा खुराक होता. आमच्यावेळी कुस्तीचा भक्कम पाया रचला गेला आज त्याला भव्य रूप आले आहे. कुस्तीची महान परंपरा शाहू कॉलेज जोपासत आहे. शाहू कॉलेजने माझ्यावर जे नितांत प्रेम केले त्यामुळे माझ्या ह्दयात शाहू कॉलेजला आदराचे असे अढळ स्थान आहे.[३१]

**श्री. आप्पा कदम -**

"माझ्यामते कुस्ती आणि इतर खेळांना एवढे प्रोत्साहन देणारे दुसरे कॉलेज महाराष्ट्राततरी क्वचीतच आढळेल. राजर्षी शाहू महाराज व कर्मवीर आण्णा हे दोघेही पैलवान होते. त्यामुळे माझ्यासारख्या विद्यार्थ्याला या कॉलेजवरून जीव ओवाळून टाकावासा आजही वाटतो.

महाराष्ट्रातील कोणत्याही कॉलेजमधील विद्यार्थी महाराष्ट्र केसरी झाला नाही. मी हे यश मिळविले ते शाहू कॉलेजने माझ्यावर जे प्रेम केले त्यामुळेच होय. हे मी अभिमानाने नमूद करतो. कला, क्रिडा, बुद्धीमत्ता इ. विविध क्षेत्रांना सदैव आणि अंतःकरणपूर्वक साथ देणाऱ्या या माझ्या महाविद्यालयास लाख, लाख प्रणाम।"[३२]

**सतिश मांडिया -**

"राजर्षी शाहू छत्रपती" यांच्या कुस्तीप्रेमाची परंपरा या करवीर नगरीतील शाहू कॉलेजने निरंतन चालू ठेवलेली आहे. या कॉलेजमुळे मी कुस्तीत आजपर्यंत जे काही यश संपादन केले याचा मला सार्थ अभिमान वाटतो. शाहू कॉलेजच्या प्रोत्साहनामुळे कुस्तीमध्ये अनेक नवे पराक्रम करण्याची जिद्द मी बाळगून आहे."[३३]

वरीलप्रमाणे महाविद्यालयाची क्रिडा क्षेत्रातील यशोगाथा आहे. ही यशोगाथा रचण्यासाठी महाविद्यालयातील क्रिडा शिक्षकांनीही तेवढेच कष्ट घेतले आहेत. त्यामध्ये प्रा. एच.बी. साळुंखे, प्रा. डी. एम. पाटील,[३४] प्रा. आर.बी. पाटील (उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना, सचिव, कोल्हापूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना, तांत्रिक अधिकारी, राष्ट्रीय मॅरेथॉन, ठाणे, तांत्रिक अधिकारी, आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, मुंबई, तांत्रिक अधिकारी, आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, पुणे, शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त).[३५]

प्रा. आर.डी. पाटील, प्रा. ए.वाय यादव, प्रा. विलास जाधव, प्रा. संभाजी पाटील (सदस्य, महाराष्ट्र कबड्डी संघ निवड समिती, कार्यवाह- कोल्हापूर, जिल्हा कबड्डी असोसिएशन, कोल्हापर, सहकार्यवाह- महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, कोल्हापूर संस्थापक, कार्यवाह, महालक्ष्मी महिला क्रिडा मंडळ, कोल्हापूर, मार्गदर्शक, छत्रपती शिवजी प्रशिक्षण क्रिडा मंडळ, कर्जत, कार्यवाह महाडीक उद्योग समुह, कबड्डी संघ, कोल्हापूर[३६], कोल्हापूर जिल्हा क्रिडा कार्यालयातर्फे 'जिल्हा क्रिडा संघटक पुरस्कार प्राप्त)[३७] प्रा. विलास जाधव, प्रा. एम.बी. सावंत, अरूण यादव, मानसिंग जाधव, आर.डी. पुजारी, प्रा. डी.डी. लोखडे[३८] वरील सर्व प्राध्यापकांचे क्रिडा क्षेत्रामध्ये योगदान मोलाचे आहे.

महाविद्यालयातील क्रिडा प्राध्यापक खेळाडूंना उत्तम प्रकारे प्रशिक्षण तर देतातच, शिवाय विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेवून त्या पूर्ण करतात. काही वेळेस शासनाचे मिळणारे अनुदान खेळाडूंना पुरत नाही. अशा वेळेस क्रिडा शिक्षक पदरमोड करून खेळाडूंना आर्थिक मदत करतात. खेळाडूंना विविध स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी फी भरावी लागते. अशा वेळेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उत्स्फुर्तपणे पैसे देतात. महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर जिमखान्यामध्ये क्रिडाशिक्षक सतत खेळाडूंसमवेत असतात. त्यांना योग्य ते मार्गदर्शन व प्रोत्साहन देतात. त्यामुळे खेळाडूंनाही प्रेरणा मिळून ते यश संपादन करू शकतात.[३९]

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

आंतरराष्ट्रीय किर्तीचे खेळाडू तयार करणे हे महाविद्यालयाचे प्रथमपासून ध्येयच आहे. हे ध्येय गाठण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राचार्यांनी प्रयत्न केले आहेत. महाविद्यालयातील प्राचार्य सर्व प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे खेळाडूंना सहकार्य झाले आहे. या सर्वांच्या आशीर्वादामुळे, प्रेरणेमुळे खेळाडू एवढे उत्तुंग यश मिळवून राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे नांव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेले आहे.

**माजी विद्यार्थी संघ -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयात कार्यरत असलेला माजी विद्यार्थी संघ हे होय. माजी विद्यार्थी संघातील सदस्य सतत महाविद्यालयाच्या संपर्कात राहून महाविद्यालयास वेगवेगळ्या प्रकारे सहकार्य करतात. महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थी संघाची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल -

**माजी विद्यार्थी संघाची स्थापना -**

माजी विद्यार्थी संघाची स्थापना १९८ साली झाली. या संघाच्या स्थापनेसाठी मा. एम. बी. शेख यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना संघामध्ये सहभागी होण्याची प्रेरणा दिली. सुरवातीला माजी विद्यार्थी संघामध्ये ५० ते ६० सदस्य होते. सध्या या सदस्य संख्येमध्ये वाढ होवून २०० माजी विद्यार्थी या संघामध्ये सहभागी आहेत. मा. श्री. एम.बी. शेख हे माजी विद्यार्थी संघाचे संस्थापक अध्यक्ष आहेत.[४०]

रयत शिक्षण संस्थेमध्ये ज्याप्रमाणे सेवक तयार झाले व त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य रयत शिक्षण संस्थेची सेवा करण्यामध्ये घालविले. त्याचप्रमाणे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये घडलेल्या अनेक नामवंत माजी विद्यार्थ्यांनी 'माजी विद्यार्थी संघाची' स्थापना केली. या संघातील सदस्यांनी संपूर्ण आयुष्यभर सेवा करण्याचे व्रत

स्विकारले आहे. माजी विद्यार्थी संघातील सर्व सदस्य गरज असेल तेव्हा एकत्र येतात व सर्वप्रकारे महाविद्यालयास सहकार्य करतात. माजी विद्यार्थी संघामध्ये कोणत्याही प्रकारच्या नियम व अटी नाहीत. परंतु या संघातील सदस्य उत्स्फुर्तपणे एकत्र येतात व महाविद्यालयास सहकार्य करतात.[४१]

**माजी विद्यार्थी संघाची उद्दिष्टये -**

१. शिक्षणाचा प्रसार करणे.

२. महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे.

३. महाविद्यलायास विविध मार्गाने सहकार्य करणे.

४. महाविद्यालयातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना दत्तक घेवून त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे.

५. होतकरू, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' योजनेमधून काम उपलब्ध करून देणे.

६. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, चारित्र्य संपन्नता, सामाजिक बांधीलकी इ. मूल्य रूजविण्यासाठी सतत मार्गदर्शन व प्रेरणा देणे.

७. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना फक्त परिक्षार्थी न बनविता एक जबाबदार नागरीक बनविण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शनपर व्याख्यान देणे.[४२]

८. गरीब पण बुद्धीमान विद्यार्थ्यांसाठी खास गुरूकुल योजना महाविद्यालयामध्ये राबविणे.[४३]

**माजी विद्यार्थी संघाचे कार्य -**

१. माजी विद्यार्थी संघातील काही सदस्यांनी विशेषतः मा. महादेव बाड, एम.बी.शेख यानी महाविद्यालयास अनेकवेळा आर्थिक सहकार्य केले आहे. महाविद्यालयासमोरील अडचण मा. महादेव बाड, एम.बी. शेख तत्पर दूर करतात.

२. इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या विविध वस्तूंचा वेळोवेळी पुरवठा मा. एम. बी. शेख व महादेव बाड यांनी केला आहे.

३. मा. महादेव बाड व मा. एम.बी. शेख यानी महाविद्यालयातील अनेक गरीब होतकरू विद्यार्थ्यांना दत्तक घेवून त्यांना काम उपलब्ध करून देवून त्यांचे शिक्षण पुर्ण केले आहे.[४४]

४. मा. एम. बी. शेख, मा. एम.के.बाड हे वरिष्ठ महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सभासद आहेत. तर मा. व्यकांप्पा भोसले कनिष्ठ महाविद्यालय स्कूल समितीचे सभासद आहेत. सभासद या नात्याने महाविद्यालयास सतत त्यांचे सहकार्य असते.[४५]

५. महाविद्यालयीन विद्यार्थी हे फक्त परिक्षार्थी बनू नयेत. महाविद्यालयीन वयामध्ये या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे संस्कार रूजावेत, त्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावे, त्यांच्यामध्ये श्रमाचे मूल्य रूजावे, ज्याप्रमाणे कर्मवीर आण्णांना विद्यार्थी घडवायचे होते. त्याप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थी घडविण्यासाठी वेळोवेळी त्यांना मार्गदर्शक प्रेरक अशी व्याख्याने माजी विद्यार्थी संघातील सदस्य देतात.[४६]

६. सद्याच्या जागतीकरण, उदारीकरण, खाजगीकरण या युगामध्ये गुणवत्तेला फार मोठे महत्त्व आहे. परंतू उच्च शिक्षण हे आता श्रीमंताचे शिक्षण राहिले आहे. अशा परिस्थितीत गरीब व बुद्धीमान असणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेचे खास प्रयत्न सुरू आहेत. या धोरणाचाच भाग म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संधाच्या वतीने अत्यंत गरीब परंतु बुद्धीमान व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी २००६ पासून 'गुरूकुल' प्रकल्प सुरू करण्याचा मानस आहे[४७]

७. माजी विद्यार्थी संघातील सदस्यांच्या विशेष कामगिरीबद्दल माजी विद्यार्थी संघातर्फे त्यांचा सत्कार, अभिनंदन करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात

येतात. या कार्यक्रमासाठी सर्व संघातील सदस्य उपस्थित राहतात.[४८]

माजी विद्यार्थी संघातील काही कर्तृत्त्ववान विद्यार्थी/सदस्यांची नांवे खालीलप्रमणे सांगता येतील[४९]

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. लक्ष्मण माने | २. | श्री. बाबासाहेब कुपेकर |
| ३. | श्री. अशोक किनिंगे | ४. | श्री . दिलीप कटके |
| ५. | श्री बाबासाहेब पखाले | ६. | श्री. किसन कुऱ्हाडे |
| ७. | श्रीमती शैला साईनकर | ८. | श्री. भाऊराव पखाले |
| ९. | श्री. माधव सांगरूळकर | १०. | श्री. व्यंकाप्पा भोसले |
| ११. | डॉ. आंनद वास्कर | १२. | श्री . विजयनाथ महाजन |
| १३. | श्री. चंद्रकुमार नलगे | १४. | श्री. हुसेन जमादार |
| १५. | श्री. आर.बी. पाटील | १६. | श्री. एम.के. बाड |
| १७. | श्री. एम.बी. शेख | १८. | श्रीमती कांचन परूळेकर |
| १९. | श्री. दिलीप कांबळे | २०. | डॉ. हरीशचंद्र निर्मळे |
| २१. | रामचंद्र सारंग | २२. | कुमारी माया जाधव |
| २३. | श्री. शहाजी काळे | २४. | श्री. आप्पा कदम |
| २५. | श्रीमती पुष्पलता मंगल | २६. | सुनिल कदम |
| २७. | श्री. मयुर तावडे | २८. | विष्णू जोशिकर |
| २९. | प्राचार्य डॉ.डी.एस.पाटील | ३०. | प्राचार्य डॉ. आय.एच्.पठाण |
| ३१. | प्रा. भारतभूषण माळी इ. | | |

आमच्या महाविद्यालयातीन जीवनामध्ये रयत शिक्षण संस्था, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, समाजातील जबाबदार संस्था व दानशूर व्यक्ती यांनी केलेल्या बहुमोल मदत व सहकार्यामुळेच आपण शिक्षण पूर्ण करून

जीवनामध्ये स्थिर होऊ शकलो. आपणास आज प्राप्त झालेल्या प्रतिष्ठेमध्ये महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे याची जाणीव 'माजी विद्यार्थी संघाला' आहे. परिणामी सदर संघ अत्यंत कृतज्ञतापूर्वक आपल्यावर झालेल्या उपकाराची अंशतः परतफेड करण्यासाठी प्रयत्नशील असतो. अशी अभिमानाची व कृतज्ञतेची भावना माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. एम.बी. शेख यांनी प्रस्तुत संशोधक विद्यार्थीनीसमोर व्यक्त केली.[५८]

वरील सदस्यांप्रमाणे अनेक माजी विद्यार्थी या संघामध्ये कार्यरत आहेत. रयत शिक्षण संस्थेकडून मिळालेले स्वावलंबन, श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकीचे व्रत, पुढच्या पिढीला देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. माजी विद्यार्थी संघातील सदस्यांच्या यशामागे महाविद्यलायाचे प्राचार्य, प्राध्यापक यांचे फार मोठे योगदान आहे असे ते मानतात. त्यांच्या प्रेरणेमुळे, मार्गदर्शनामुळे, प्रेमामुळे अनेक अडचणींवर मात करून त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले व जीवनामध्ये यशस्वी झाले. सध्याच्या काळामध्ये समाज चंगळवादी बनत चालला आहे. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहे. सध्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, योग्य दिशेची गरज आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी [illegible] जावू नये यासाठी माजी विद्यार्थी संघातील सदस्य महाविद्यालयाच्या सतत सपंर्कामध्ये राहून आपली नैतिक जबाबदारी पार पाडतात.

## संदर्भ सूची


१. नॅक अहवाल २००३-२००४ 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, भाग २, पृ. क्र. ६२.

२. मुलाखत, प्रा. संभाजी पाटील, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, दिनाक ३०/११/२००९.

३. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २०००-२००१.

४. उपरोक्त मुलाखत प्रा. संभाजी पाटील.

५. कित्ता.

६. रौप्यमहोत्सवी स्मरणिका 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर' लेख आमची २५ वर्षाची वाटचाल भाग-तीन, क्रिडा विभाग, प्रा. रामचंद्र पाटील.

७. उपरोक्त मुलाखत प्रा. संभाजी पाटील.

८. उपरोक्त नॅक अहवाल, पृ. क्र. ६२. भाग-२

९. कित्ता.

१०. मुलाखत, प्रा. लवंगारी, जी. एम., राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, दिनांक २९/११/२००९.

११. नॅक अहवाल, राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, भाग-१, पृ.क्र. ६३.

१२. उपरोक्त मुलाखत प्रा. लवंगारी जी. एम.

१३. उपरोक्त मुलाखत प्रा. संभाजी पाटील.

१४. कित्ता.

१५. कित्ता.

१६. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९६७ ते २००५.

१७. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९८१-८२, १९८२-८३.

१८. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९८४-१९८५.

१९. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९८२-१९८३.

२०. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९८४-१९८५.

२१. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९९७-१९९८.

२२. उपरोक्त नॅक अहवाल, भाग-१, पृ. क्र. ६३, ६४, ६५.

२३. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००२-२००३.

२४. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००३-२००४, पृ. क्र. ८२,८३.

२५. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००४-२००५, पृ. क्र. ९७.

२६. उपरोक्त नॅक अहवाल, भाग-१, पृ. क्र. ६२.

२७. उपरोक्त वार्षिक नियतकालिक २००३-०४, पृ. क्र.८२.

२८. उपरोक्त नॅक अहवाल, पृ. क्र. ७४, भाग-२

२९. उपरोक्त रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख माझ्या जीवनातील सोनियाचा दिन । श्री. पी. जी. पाटील.

३०. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख- राष्ट्रकुल सुवर्णपदक व शिवछत्रपती पुरस्कार, श्री. रामचंद्र सांरग.

३१. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख- मी आणि शाहू कॉलेज, श्री. नामदेव आप्पाजी पाटील.

३२. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख - मी महाराष्ट्र केसरी कसा झालो, श्री. आप्पा कदम.

३३. उपरोक्त, रौप्यमहोत्सवी स्मरणिका, लेख- शाहू कॉलेज मध्ये पैलवानांचे भविष्य उज्वल, श्री. सतिश मांडिया.

३४. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', १९७२-७३.

३५. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००५-०६.

३६. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००३-०४, पृ. क्र. ९३.

३७. उपरोक्त, वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००५-०६, पृ. क्र. ३.

३८. कित्ता, पृ. क्र. ११२.

३९. उपरोक्त मुलाखत, प्रा. संभाजी पाटील दिनांक ३०/११/२००९.

४०. मुलाखत श्री. महादेव बाड दिनांक ५/१२/२००९, (सदस्य माजी विद्यार्थी संघ- राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर) व श्री एम.बी.शेख, अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ - राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर, दिनाक ६/१२/२००९.

४१. कित्ता.

४२. कित्ता.

४३. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००५-०६.

४४. मुलाखत, श्री. महादेव बाड.

४५. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००५-०६.

४६. मुलाखत, श्री. महादेव बाड.

४७. वार्षिक नियतकालीक 'राजर्षी', २००५-०६.

४८. मुलाखत, श्री. महादेव बाड.

४९. नॅक अहवाल राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, पृ. क्र. ६६, ६७, ६८, भाग - १

५०. मुलाखत, मा. एम.बी.शेख, अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर.

❑❑❑